# पाणी कोठून मिळते?

आभाळात ढग येतात.
गडगडाट होतो.
आभाळ भरून येते.
पाऊस येतो.



पावसाचे पाणी जमिनीवर पडते.
हे सारे पाणी जाते कुठे ?

© होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, मुंबई ४००००५
प्रकाशक: इंडियन इंस्टिट्यूट ऑफ एज्युकेशन
पुणे ४११०२९

आपण एक गंमत पाहू.
एका काचेच्या पेल्यात थोडी माती घाला.
ती दाबून बसवा.
पेल्यात थोडे पाणी ओता.
माती ओली होते.
पाणी मातीत झिरपते.
जास्त ओतले तर तळाशी जमते.



पावसाचे बरेच पाणी वाहून जाते.
थोडे जमिनीत शिरते.
खोल खोल जाते.
जमिनीत खडक लागला की थांबते.
खडकात पाणी झिरपत नाही.
पाणी तेथेच साचते.



(3)

जमिनीत खोल खणले तर पाणी लागते.

जमिनीला, खडकाला फट असेल तर पाणी बाहेर पडते.



झरा वहातो.

झऱ्याचे पाणी उताराकडे वहाते,
अडले की खोलगट भागात साचते.
तलाव तयार होतो.



डोंगरात खूप झरे असतात.
झऱ्याला झरे मिळतात.
त्यांचा ओढा होतो.

ओढ्यांना ओढे मिळतात.
त्यांची नदी होते.

कधीकधी विहिरींचे पाणी आटते. (४)



ओढ्यांवर, नाल्यांवर बांध घालतात.
तलाव तयार करतात.
तलावाचे पाणी खूप दिवस पुरते.
शिवाय, थोडे पाणी जमिनीत मुरते.
जमिनीखालून वहात रहाते.
जवळच्या विहिरींचे झरे सुरू होतात.
विहिरींना पाणी लागते.



मोठ्या नद्यांवर धरणे बांधतात.
धरणाचा तलाव खूप मोठा असतो.
तलावाचे कालवे काढतात.
शेतीला पाणी पुरवतात.